**अशाप्रकारे स्थानिक गुन्हे शाखा, धुळे व पिंपळनेर पोलीस ठाणे यांचे संयुक्त पथकाने, गावठी पिस्टलचा धाक दाखवुन घरफोडया करणाऱ्या अट्टल घरफोडयास मुद्देमालासह ओटाबारी (पिंपळनेर) येथुन रमेश शिवा वसावा, वय-41 वर्ष, रा.गव्हाण ता.उच्छल जि.तापी (गुजरात राज्य) यास ताब्यात घेवुन एकुण 2,42,800/- रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करुन खालील 03 घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. सदर आरोपी घरफोडी करतांना गावठी कट्टा सोबत बाळगत असे. सदर आरोपीचे अंगझडतीत एक गावठी कट्टा व एक जिवंत काडतुस मिळुन आले आहे.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| 1) | पिंपळनेर | 323/2024 | BNS क.334(1) |
| 2) | पिंपळनेर | 04/2025 | BNS क.331(3), 331(4), 305 |
| 3) | पिंपळनेर | 190/2024 | भादंवि क.380, 461 |

**आरोपी रमेश शिवा वसावा, वय-41 वर्ष, रा.गव्हाण ता.उच्छल जि.तापी (गुजरात राज्य) याचेविरुध्द खालील प्रमाणे चोरी, घरफोडी व जबरीचोरीचे गुन्हे दाखल आहेत.**

| क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| 1) | उच्छल पोलीस ठाणे (गुजरात) | 66/2015 | भादंवि क.380, 457 |
| 2) | व्यारा पोलीस ठाणे (गुजरात) | 321/2016 | भादंवि क.380, 457 |
| 3) | उच्छल पोलीस ठाणे (गुजरात) | 35/2019 | भादंवि क.380, 457 |
| 4) | नवापूर पोलीस ठाणे (नंदुरबार) | 259/2018 | भादंवि क.394, 341, 504, 427, 34 |
| 5) | खापर पोलीस ठाणे (नंदुरबार) | 55/1999 | भादंवि क.379 |
| 6) | साक्री पोलीस ठाणे (धुळे) | 266/2024 | BNS क.331(4), 305(अ) |
| 7) | ताहराबाद पोलीस ठाणे (नाशिक ग्रामीण) | 169/2024 | भादंवि क.380, 457 |

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, पिंपळनेर पोलीस ठाणेचे सपोनि.किरण बर्गे, पोउनि.ईश्वर शिरसाठ, असई.संजय पाटील, पोहेकॉ.सदेसिंग चव्हाण, पोहेकॉ.तुषार सुर्यवंशी, पोहेकॉ.देवेंद्र ठाकुर, पोकॉ.निलेश पोतदार, पोकॉ.सुनिल पाटील, पोकॉ.अतुल निकम, पोकॉ.हर्षल चौधरी, चापोहेकॉ.कैलास महाजन तसेच पिंपळनेर पोलीस ठाणेचे पोकॉ.चेतन गोसावी, पोकॉ.रविंद्र सुर्यवंशी, पोकॉ.पंकज व पोकॉ.कैलास कोळी अशांनी केली आहे.

( श्रीकांत धिवरे )
पोलीस अधीक्षक, धुळे

**प्रति,**

मा.जिल्हा समिती व जनसंपर्क अधिकारी, धुळे
मा.संपादक / वार्ताहार / सर्व वृत्तपत्रे व ईलेक्ट्रॉनिक मिडीया
2/- जनहितार्थ प्रसारणासाठी.

# पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे

दुरभाष-02562-288207 Email- sp.dhule@mahapolice.gov.in फॅक्स नं.02562-229188


प्रेस नोट **धुळे, दिनांक :- 07/01/2025**

## गावठी पिस्टलचा धाक दाखवुन घरफोडया करणाऱ्या अट्टल घरफोडयास मुद्देमालासह घेतले ताब्यात

दि.28/12/2024 रोजी 20.30 वा. ते दि.29/12/2024 रोजी 09.00 वाजेचे दरम्यान सामोडे गावाचे शिवारातील फिर्यादी श्री.शाम शांताराम भदाणे, रा.सामोडे ता.साक्री यांचे लक्ष्मी अॅग्रो इंडस्ट्रिज नावाचे पत्रटी गोडावुन फोडुन एकुण 2,17,800/- रु. किं.चे वेल्डींग मशीन, रोटर, नांगर, कल्टीवेटर, हॅण्ड ग्राइंडर इ. अज्ञात चोरटयांनी चोरुन नेल्याने पिंपळनेर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.323/2024 BNS क.334(1) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना दि.06/01/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना प्राप्त गोपनिय माहितीचे आधारे, पिंपळनेर पोलीस ठाणेचे पथकासह ओटा बारी (पिंपळनेर) येथुन रमेश शिवा वसावा, वय-41 वर्ष, रा.गव्हाण ता.उच्छल जि.तापी (गुजरात राज्य) यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयातील चोरी केलेला मुद्देमाल काढुन दिला. तसेच त्याचे अंगझडतीत एक गावठी कट्टा व एक जिवंत राऊंड मिळुन आले आहेत.

तद्नंतर पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गोपनिय माहिती प्राप्त झाली की, पिंपळनेर ते सामोडे रोडवरील भारत गॅस गोडावुनजवळील शेतातील कांदयाचे चाळीत ठेवलेले सोयाबीन चोरी बाबत पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.04/2025 BNS क.331(3), 331(4), 305 दाखल असलेला गुन्हा देखील हयाच आरोपी रमेश शिवा वसावा याने केला आहे. त्याअनुषंगाने त्याचेकडे विचारपुस केली असता, त्याने गुन्हयाची कबुली देवुन, पांगरण ता.नवापूर जि.नंदुरबार येथे लपवुन ठेवलेले 70 गोण्या सोयाबीन काढुन दिले आहे.

त्याप्रमाणे त्यास पुन्हा विश्वासात घेवुन विचारपुस केली असता, बोपखेल येथील प्रभात बिअर शॉपी मधुन इन्व्हेटर व बॅटरी चोरी बाबत पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.190/2024 भादंवि क.380, 461 दाखल असलेला गुन्हा देखील हयाच आरोपी रमेश शिवा वसावा याने केला आहे. त्याअनुषंगाने त्याचेकडे विचारपुस केली असता, त्याने गुन्हयाची कबुली देवुन, पांगरण ता.नवापूर जि.नंदुरबार येथे लपवुन ठेवलेले एक मायक्रोटेक्स कंपनीचे इन्व्हेटर व मॅसिमो कंपनीची बॅटरी काढुन दिली आहे.

आरोपीने गुन्हयात चोरी केलेला खालील मुद्देमाल काढुन दिल्याने हस्तगत करण्यात आला आहे. मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ.क्र. | किंमत | मुद्येमालाचे वर्णन |
|---|---|---|
| 1) | 3,000/- | रु.किं.चे हॅण्ड ग्राइंडर |
| 2) | 25,000/- | रु.किं.चे लोखंडी टिलर |
| 3) | 1,71,800/- | रु.किं.चे एकुण 70 गोण्या सोयाबीन |
| 4) | 25,000/- | रु.किं.चा गावठी कट्टा |
| 5) | 3,000/- | रु.किं.चे 01 जिवंत काडतुस |
| 6) | 15,000- | रु.किं.चे एक मायक्रोटेक्स कंपनीचे इन्व्हेटर व मॅसिमो कंपनीची बॅटरी |
| | **2,42,800/-** | **एकुण मुद्देमाल हस्तगत** |